20 SEP 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या १४ संशोधकांची 'जागतिक आघाडी'

## दोन टक्के संशोधकांच्या यादीत स्थान; अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाकडून क्रमवारी जाहीर

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची २०२४ साठीची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने सोमवारी जाहीर केली. त्यात शिवाजी विद्यापीठाच्या चौदा संशोधकांनी स्थान मिळविले.

जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रा. ए. व्ही. राव, सी. एच. भोसले (पदार्थविज्ञान), एस. पी. गोविंदवार, डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), केशव राजपुरे, ए. व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), सागर डेळेकर, के. एम. गरडकर, हेमराज यादव (रसायनशास्त्र), टी. डी. डोंगळे, सुशीलकुमार जाधव (नॅनोसायन्स), संलग्नित महाविद्यालयांतील संशोधक डॉ. व्ही. एल. पाटील, एस. ए. व्हनाळकर (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे. या संशोधकांचा आज विद्यापीठ कार्यालयात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथभेट व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

> गेली पाच वर्षे सातत्याने शिवाजी विद्यापीठाचे संशोधकीय स्थान जगाच्या नकाशावर हे संशोधक अधोरेखित करीत आहेत, ही अत्यंत आनंदाची बाब आहे.
> **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

विद्यापीठामध्ये या संशोधकांनी संशोधनाची एक शिस्त निर्माण केली, त्याला सर्वच कुलगुरूंनी मोलाची प्रशासकीय साथ दिली. त्यामुळे एक उत्तम संशोधन परंपरा विद्यापीठात निर्माण झाली आहे. हा वारसा नवसंशोधकांनी पुढे घेऊन जाण्यास सिद्ध व्हावे, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली.

या १४ संशोधकांव्यतिरिक्त राज्यासह जगभरात अन्य शिक्षण संस्था, विद्यापीठांत कार्यरत असणारे शिवाजी विद्यापीठाचे अनेक माजी विद्यार्थीही या दोन टक्के संशोधकांत समाविष्ट आहेत. ही उज्ज्वल संशोधन परंपरा विद्यापीठाने निर्माण केली आहे. ही पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी भावी पिढीने घ्यावी, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी केले. प्रा. भोसले, गोविंदवार, राजपुरे आणि प्रा. जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सागर डेळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील चौदा संशोधकांनी जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत स्थान मिळवले. त्यांचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सुहासिनी पाटील, अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.

### असे आहे रँकिंग

संशोधन गुणवत्ता निर्धारित करण्यासाठी स्टॅनफोर्ड विद्यापीठाने सायटेशन्स, एच निर्देशांक, सहलेखकत्व, संशोधन लेखकाची नेमकी भूमिका या घटकांचा विचार करून संयुक्त सूचक निर्देशांक काढून ही जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची क्रमवारी प्रसिद्ध केली. ही प्रणाली आयसीएसआर लॅबद्वारे एल्सेव्हियरने प्रदान केलेल्या स्कोपस डेटाचा वापर करते.

जनसंपर्क कक्ष
20 SEP 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : विद्यापीठातील १४ संशोधकांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी इतर मान्यवर.

# जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांमध्ये विद्यापीठाचे १४

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची २०२४ साठीची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केली. यात शिवाजी विद्यापीठाच्या १४ संशोधकांनी स्थान मिळवले. गेली पाच वर्षे सातत्याने शिवाजी विद्यापीठाचे संशोधकीय महत्त्व जगाच्या नकाशावर हे संशोधक अधोरेखित करीत आहेत, ही आनंदाची बाब आहे, असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

क्रमवारीतील संशोधकांचा गुरुवारी विद्यापीठ कार्यालयात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथभेट व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, जागतिक यादीमध्ये स्थान मिळण्यामागे या सर्वांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ अव्याहतपणे केलेले संशोधन कारणीभूत आहे. संशोधनाचे व्यसन असल्यामुळेच त्यांना हे यश साधता आले आहे.

**● अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाची २०२४ साठीची क्रमवारी जाहीर**

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, निवृत्त प्रा. ए. व्ही. राव, निवृत्त प्रा. सी. एच. भोसले, डॉ. केशव राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), निवृत्त प्रा. एस. पी. गोविंदवार, डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), डॉ. सागर डेळेकर, प्रा. के. एम. गरडकर, डॉ. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनोसायन्स) व संलग्नित महाविद्यालयांतील संशोधक डॉ. व्ही. एल. पाटील, डॉ. एस. ए. व्हनाळकर (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे.

इनोव्हेशन, इन्क्युबेशन व लिंकेजिस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले.

20 SEP 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जगातील २ टक्के संशोधकांमध्ये विद्यापीठाच्या १४ संशोधकांचा समावेश

■ अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाची यादी जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची सन २०२४ साठीची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केली आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या १४ संशोधकांनी स्थान प्राप्त केले आहे. गेली पाच वर्षे सातत्याने शिवाजी विद्यापीठाचे संशोधकीय स्थान जगाच्या नकाशावर हे संशोधक अधोरेखित करीत आहेत, ही अत्यंत समाधानाची व आनंदाची बाब आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी सांगितले.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू तथा ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रमोद पाटील (पदार्थविज्ञान) यांच्यासह निवृत्त प्रा. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान),निवृत्त प्रा. सी. एच.भोसले (पदार्थविज्ञान), निवृत्त प्रा. एस.पी. गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), डॉ. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ.ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र),डॉ. ए.व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), डॉ.सागर डेळेकर (रसायनशास्त्र),प्रा.के.एम. गरडकर (रसायनशास्त्र), डॉ.टी. डी. डोंगळे (नॅनोसायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनोसायन्स), डॉ. हेमराज यादव (रसायनशास्त्र) आणि संलग्नित महाविद्यालयांतील संशोधक डॉ. व्ही.एल. पाटील (पदार्थविज्ञान) व डॉ. एस.ए. व्हनाळकर (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, हा वारसा नवसंशोधकांनी पुढे घेऊन जाण्यास सिद्ध व्हायला हवे.. प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रा. सी. एच. भोसले, प्रा. एस. पी. गोविंदवार, प्रा. केशव राजपुरे आणि प्रा. ज्योती जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संशोधकांचा गौरव करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के सोबत डॉ. के. एम. गरडकर, डॉ. ज्योती जाधव, डॉ. एस. पी. गोविंदवार, डॉ. सी. एच. भोसले आदी.

## असे आहे स्टॅनफोर्ड विद्यापीठाचे रँकिंग

अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने शोधनिबंधाला मिळणारी सायटेशन्स, एच निर्देशांक, सहलेखकत्व, संशोधन लेखकाची नेमकी भूमिका या घटकांचा सारासार विचार करून सर्वसमावेशक आणि सर्वमान्य अशी संयुक्त सूचक (सी स्कोर) निर्देशांक काढून ही जागतिक आघाडीच्या २ टक्के संशोधकांची क्रमवारी प्रसिद्ध केली. दरवर्षी ही प्रमाणित क्रमवारी जाहीर करण्यात येते. या रँकिंगमुळे केवळ एका विषयातीलच नव्हे, तर सर्व विषयांमधील गुणवत्तेची तुलना करणे शक्य झाले. स्कोपस' डेटाबेसवर आधारित 'एल्सव्हिअर'ने तयार केलेल्या यादीसाठी १९६० ते २०२४ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणार्या संशोधकांची सार्वकालिक कामगिरी आणि वार्षिक कामगिरी अशा दोन निकषांवर निवड करण्यात आली. २२ विज्ञान विषय आणि १७४ उपविषयांमधील संशोधनाची यात दखल घेतली गेली. सार्वकालिक कामगिरीच्या यादीत प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. राव, डॉ. राजपुरे, डॉ. भोसले, डॉ. गोविंदवार डॉ. ज्योती जाधव यांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
लोकमत

# समीर चव्हाण यांना 'गुरुनाथ मुंगळे' पुरस्कार जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठतर्फे



यंदाच्या वर्षापासून देण्यात येणारा 'सद्‌गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार' प्रा. समीर चव्हाण (आयआयटी, कानपूर, उत्तर प्रदेश) यांना जाहीर केला. या पुरस्काराचे रोख ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ असे स्वरूप असून, या पुरस्काराचे लवकरच वितरण केले जाणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

प्रा. समीर चव्हाण हे आयआयटी, कानपूर येथे गणित विषयाचे प्राध्यापक म्हणून काम करत आहेत. चव्हाण यांनी अखई ते जाले (तुकाराम : हिंदुस्तानी परिवेशात) हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांच्या नावावर हौस, काळाची सामंती निगरण, रात्रीची प्रतिबिंबे कवितासंग्रह, समकालीन गझल : एक व्यासपीठ, समकालीन गझल : एक अवलोकन समीक्षाग्रंथही प्रसिद्ध आहेत.

20 SEP 2024 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'फिल्म मेकिंग'च्या विद्यार्थ्यांची चित्रनगरीला भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागातर्फे सुरू असलेल्या बी. ए. फिल्म मेकिंग, तसेच पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या शॉर्ट फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांनी चित्रनगरीला भेट दिली.

यावेळी चित्रनगरीमध्ये सुरू असणाऱ्या विविध टी.व्ही. मालिकांच्या शूटिंग सेटला भेट देऊन निर्मिती प्रक्रिया जाणून घेतली. नव्याने उभारण्यात येत असलेल्या रेल्वे स्टेशन सेट, इतर फ्लोअर, तसेच अन्य सोयींबाबत सचिन कुडची यांनी माहिती दिली. ज्येष्ठ गॉफरमन सुरेश लाड यांनी विविध प्रकारच्या लाईटस्, फिल्टर्स, कटर्स, स्टँड यांची माहिती दिली. येथे उभारलेले मंदिर, वाडा, चाळ, पौराणिक काळातील गाव आदींचे सेट डिझाईन विद्यार्थ्यांनी अनुभवले. निर्मिती व्यवस्थापक मिलिंद अष्टेकर, निर्माता शंतनू गंगणे, अभिनेते शशांक शेंडे, तेजा नेसवणकर, दिग्दर्शक निशांत सुर्वे व मकरंद माने यांनी माहिती दिली.

ही भेट यशस्वी होण्यासाठी चित्रनगरीचे व्यवस्थापक दिलीप भांदिगरे, डॉ. कविता गगराणी यांनी प्रयत्न केले. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव व प्रसिद्ध अभिनेते आनंद काळे यांनी प्रोत्साहन दिले. लेखक-दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी संयोजन केले. डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील यांनी सहाय्य केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
तरुण भारत

# फिल्म मेकींगच्या विद्यार्थ्यांची चित्रनगरीला भेट

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने सुरू असलेल्या बी. ए. फिल्म मेकिंग तसेच पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या शॉर्ट फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांनी कोल्हापूर चित्रनगरीला भेट दिली. चित्रनगरीमध्ये सुरु असणाऱ्या विविध टिव्ही मालिकांच्या शूटिंग सेटला विद्यार्थ्यांनी भेट देऊन मालिकेची निर्मिती प्रक्रिया जाणून घेतली. सचिन कुडची यांनी माहिती दिली. ज्येष्ठ गॉफरमन सुरेश लाड यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या लाईट, फिल्टर्स, कटर्स, स्टॅन्ड यांची माहिती दिली. निर्मिती व्यवस्थापक मिलिंद अष्टेकर, निर्माता शंतनु गंगणे, अभिनेते शशांक शेंडे, तेजा नेसवणकर तसेच दिग्दर्शक निशांत सुर्वे व मकरंद माने यांनी निर्मिती प्रक्रिया आणि प्रोडक्शन बाबत माहिती दिली. चित्रनगरीचे व्यवस्थापक दिलीप भांदीगरे, डॉ. कविता गगराणी यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव व अभिनेते आनंद काळे यांनी अभ्यास भेटीसाठी प्रोत्साहन दिले. डॉ. सुमेधा साळुंखे व जयप्रकाश पाटील यांनी सहाय्य केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
पुण्यनगरी

# हिंदी दिनानिमित्त २३ रोजी विविध स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागातर्फे हिंदी दिनानिमित्त दि. २३ सप्टेंबर रोजी स्वलिखित कविता वाचन व दि. २५ सप्टेंबर रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आहे. या स्पर्धेसाठी हिंदी भारत की सांस्कृतिक धरोहर, हिंदी भाषा और युवाओं का भविष्य, हिंदी फिल्मों का समाजपर प्रभाव, रिल्स का युवाओं पर प्रभाव, वैश्विक स्तर पर हिंदी, सिनेमा और मीडिया में हिंदी भाषा का प्रभाव हे विषय आहेत, अशी माहिती हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
तरुण भारत

# हिंदी दिनानिमित्त विद्यापीठात विविध स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाच्यावतीने हिंदी दिनानिमित्त विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी सोमवारी, २३ रोजी स्वलिखित कविता वाचन व बुधवारी, २५ रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. दोन्ही स्पर्धेतील विजेत्यांना अनुक्रमे १५०१, १००१ व ७०१ रूपये रोख बक्षीस, ट्रॉफी व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. स्पर्धा हिंदी विभागात सकाळी ११ वाजता सुरू होतील. वक्तृत्व स्पर्धेसाठी हिंदी भारत की सांस्कृतिक धरोहर, हिंदी भाषा और युवाओं का भविष्य, हिंदी फिल्मों का समाज पर प्रभाव, रिल्स का युवाओं पर प्रभाव, वैश्विक स्तर पर हिंदी, सिनेमा और मीडिया में हिंदी भाषा का प्रभाव आदी विषयावर होणार असल्याची माहिती हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी दिली.

आवकजावक विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
पुढारी

# महिला सुरक्षितता, शिष्यवृत्ती विषयावर आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.२०) 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर विभागस्तरीय कार्यशाळा सिनेट सभागृहात होणार आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते १० वाजता उद्घाटन होईल. जिल्हाधिकारी अमोल येडगे 'महिला सुरक्षा धोरण', जिल्हा पोलिस प्रमुख डॉ. महेंद्र पंडित 'संकटसमयी कोठून मदत घ्यावी?', ॲड. ठोंबरे 'महिला सुरक्षाविषयक कायदे' आणि विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे 'राजर्षी शाहू शिष्यवृत्ती' यावर मार्गदर्शन करतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
सकाळ

# 'महिला सुरक्षितता'वर आज कार्यशाळा

कोल्हापूर : उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि शिवाजी विद्यापीठातर्फे शुक्रवारी (ता. २०) 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर विभागस्तरीय कार्यशाळा विद्यापीठात होणार आहे, अशी माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आणि विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सकाळी दहा वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होईल. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे प्रमुख पाहुणे, तर जिल्हा पोलिसप्रमुख डॉ. महेंद्र पंडित, विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे प्रमुख उपस्थित असतील. या कार्यशाळेत जिल्हाधिकारी येडगे हे 'महिला सुरक्षा धोरण', जिल्हा पोलिसप्रमुख डॉ. पंडित हे 'संकटसमयी कोठून मदत घ्यावी?', ॲड. ठोंबरे हे 'महिला सुरक्षाविषयक कायदे' आणि डॉ. उबाळे हे 'राजर्षी शाहू शिष्यवृत्ती' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती डॉ. देवळाणकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
सकाळ



# विद्यापीठ परीक्षांचे अर्ज भरण्यास उद्यापर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील (ऑक्टोबर-नोव्हेंबर) पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे अर्ज भरण्यास परीक्षा व मूल्यमापन मंडळाने शनिवारपर्यंत (ता. २१) मुदतवाढ दिली. या सत्रापासून विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाकडून कला, वाणिज्य, विज्ञान या विद्याशाखेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. महाविद्यालयांकडील प्रथम, द्वितीय वर्षांच्या परीक्षांची जबाबदारी या परीक्षा मंडळाने स्वतःकडे घेतली आहे. त्यानुसार या परीक्षांचे वेळापत्रकही जाहीर केले आहे. विद्यार्थी हितासाठी या परीक्षांचे अर्ज भरण्यास या मंडळाने शनिवारपर्यंत मुदत वाढविली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
पुढारी

# विद्यापीठाच्या सत्र परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे २०२४-२५ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील हिवाळी सत्रात होणाऱ्या परीक्षांचे अर्ज भरण्यास २१ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. परीक्षा विभागाच्या प्रसिद्धिपत्रकानुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालये, पदव्युत्तर अधिविभागात दि. २१ पर्यंत अर्ज करता येणार आहे. त्याच दिवशी महाविद्यालय व पदव्युत्तर विभागांनी परीक्षा अर्ज ॲप्रुव्ह करायचे आहेत. २४ सप्टेंबरपर्यंत सर्व परीक्षा अर्ज याद्या जमा करण्याची मुदत आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
तरुण भारत

# विद्यापीठात आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी, २० रोजी 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती"वर विभागस्तरीय कार्यशाळेचे आयोजन केल्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सांगितले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते सकाळी १० वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. दिवसभरातील विविध सत्रांत जिल्हाधिकारी अमोल येडगे 'महिला सुरक्षा धोरण', जिल्हा पोलिस प्रमुख महेंद्र पंडित 'संकटसमयी कोठून मदत घ्यावी,' अॅड. ठोंबरे हे 'महिला सुरक्षाविषयक कायदे' यावर मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
पुढारी

# विद्यापीठात आज डिजिटल माध्यमांच्या उत्पन्नाचे स्रोत विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने शुक्रवारी (दि. २०) 'डिजिटल माध्यमांच्या उत्पन्नाचे स्रोत' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. अध्यासनाच्या इमारतीत सकाळी साडेदहा वाजता कार्यशाळेचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन होईल. कार्यशाळेत नवी दिल्ली येथील झी इंटरनॅशनलच्या विओन क्रीडा वृत्तवाहिनीचे क्रीडा विश्लेषक आदित्य पिंपळे व सोलापूर येथील एबी न्यूजचे संपादक गणेश गायकवाड मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळा सर्वांसाठी खुली आहे, विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
तरुण भारत

# वासंतीदेवी पाटील फार्मसीत शिक्षकांसाठी एकदिवशीय कार्यशाळा

वारणानगर : कोडोली ता.पन्हाळा येथील श्री यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये शिवाजी विद्यापीठ प्रायोजित, फार्मसी महाविद्यालयातील शिक्षकांसाठी फार्माकोव्हिजिलन्स या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली. उद्घाटन प्राचार्य डॉ. ए.एस.मंजाप्पा यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स फ्रेश ग्राविटी पुणे,चे संचालक देवेन बाब्रे, कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन पुणेचे गट व्यवस्थापक भूषण बापट आणि आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, सांगलीच्या प्रोफेसर डॉ. पद्मा लड्डा मार्गदर्शक म्हणून लाभले होते. यासाठी विद्यापीठ सलंग्नित फार्मसी कॉलेजमधून १५ हून अधिक प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेसाठी संस्थेचे सचिव डॉ. जयंत पाटील व विश्वस्त सौ. विनिता पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रा . उत्कर्ष नागवेकर यांनी केले. तर आभार समन्वयक प्रा. सुप्रिया पाटील यांनी मानले. या कार्यक्रमासाठी अधीक्षक वैशाली पोवार, प्रा. शिवप्रसाद डोईजड, प्रा. प्रथमेश खाडे, प्रा.व्यंकटेश कुंभार, प्रा. स्नेहा जाधव प्रा.शैलजा पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
पुढारी

# जयसिंगपुरात शिवाजी विद्यापीठाचा उद्या जिल्हास्तरीय युवा महोत्सव

**जयसिंगपूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचा ४४ वा एक दिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव शनिवारी (दि.२१) जयसिंगपूर कॉलेज येथे होत आहे. महोत्सवात वैयक्तिक व सांघिक कला प्रकारांचे सादरीकरण केले जाणार आहेत. यामध्ये लोकनृत्य, लोककला, मूकनाट्य, लघु नाटिका, लोकसंगीत, एकल लोकवाद्य वादन, वादविवाद, मराठी, हिंदी व इंग्रजी वक्तृत्व, पथनाट्य, प्रश्नमंजुषा, एकांकिका, सुगम गायन, भारतीय समूहगीत व एकपात्री अभिनय अशा स्पर्धा होणार असल्याची माहिती, लोकल कमिटीचे सचिव डॉ. महावीर अक्कोळे व प्राचार्य डॉ. सुरत मांजरे यांनी पत्रकार बैठकीत दिली.

अक्कोळे व मांजरे म्हणाले, महोत्सवाचे उद्घाटन शनिवारी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होईल. याप्रसंगी विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. तानाजी चौगुले, विद्यापीठ युवा महोत्सव संयोजन समितीतील पदाधिकारी, सदस्य, कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिग्रे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी अध्यक्ष डॉ.सुभाष अडदंडे, सचिव डॉ. महावीर अक्कोळे, प्राचार्य डॉ. सुरत मांजरे, प्रा. डॉ. सौ. विजयमाला चौगुले, सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत. या ४४ व्या युवा महोत्सव स्पर्धेचे कोल्हापूर जिल्हास्तरीय यजमानपद जयसिंगपूर कॉलेजला मिळाले आहे. कॉलेज प्रशासनाकडून जय्यत तयारी झाली असून काम अंतिम टप्प्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2024
पुण्यनगरी

# जयसिंगपूरमध्ये २१ रोजी युवा महोत्सव

**जयसिंगपूर :** शिवाजी विद्यापीठाचा ४४ वा एकदिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव येथील जयसिंगपूर महाविद्यालयात शनिवार, दि. २१ सप्टेंबर रोजी होत आहे. या महोत्सवात वैयक्तिक व सांघिक कला प्रकारांचे सादरीकरण केले जाणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. एस. ए. मांजरे यांनी दिली. या स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ९ वाजता शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. विद्यार्थी विकास विभागाचे प्र. संचालक डॉ. तानाजी चौगले, जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिये यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ. सुभाष अडदंडे आहेत. तर सचिव डॉ. महावीर अक्कोळे, स्थानिक संयोजन सचिव प्रा. डॉ. विजयमाला चौगुले आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यामध्ये लोकनृत्य, लोककला, मूकनाट्य, लघू नाटिका, लोकसंगीत, एकल लोकवाद्य वादन, वादविवाद, मराठी, हिंदी व इंग्रजी वक्तृत्व, पथनाट्य, प्रश्नमंजुषा, एकांकिका, सुगम गायन, भारतीय समूहगीत, एकपात्री अभिनय अशा स्पर्धा होणार आहेत.